आर.सी.सी. ४०/२०१७
**निशाणी ८३**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ७ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – दिलीप रंगनाथ पानसरे, वय – ५८ वर्षे,
व्यवसाय – सेवा निवृत्त, सहाय्यक फौजदार राहणार – संगमनेर,
तालुका – संगमनेर, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी विधिज्ञा श्रीमती. के. आर. उतळे यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक १६/०१/२०१७ रोजी मी पोलीस स्टेशन अकोले येथे हेड कॉस्टेबल म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी ठाणे अंमलदार म्हणून हेड कॉस्टेबल करमाळे हे होते. गुन्हा नंबर ०७/२०१७ त्यांनी नोंदवला होता. सदर गुन्ह्याचा तपासाचा आदेश मला करमाळे यांनी तोंडी दिला होता. ज्यावेळी माझ्याकडे तपास आला त्यावेळी माझ्याकडे एफ.आय.आर व दैनिक अहवाल हे कागदपत्र आले होते.

२. माझ्याकडे तपास आल्यानंतर मी फिर्याद वाचून घटनास्थळी जावून घटनास्थळाचा २ पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला अभिलेखावरील सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ८४** देण्यात येते. घटनास्थळी शेती होती. त्यानंतर आरोपी अटक केले. मी आरोपींना ओळखतो ते आज न्यायालयात हजर आहेत. त्यानंतर मी साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदवले, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून कागदपत्रात समाविष्ट केले. आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. एन. मनकर यांच्या मार्फत</u> –

३. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आला होता त्याचवेळी गुन्हा रजिस्टर क्रमांक ०६/२०१७ चा तपासही माझ्याकडे आला होता. गुन्हा रजिस्टर नं. ०६/२०१७ चा तपास मी केला आहे. गुन्हा रजिस्टर नं. ०७/२०१७ मधील फिर्यादी ही १५:३६ वाजता नोंदवण्यात आली होती. ठाणे अंमलदार करमाळे हे सेवेत कार्यरत आहेत.

४. गंभीर स्वरूपाच्या गुन्हयातील फिर्यादी फिर्याद देण्याकरीता पोलीस स्टेशनला आल्यास आम्ही त्यास अगोदर मेडीकलला पाठवतो व त्यानंतर फिर्याद घेवून गुन्हा नोंद केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा नं. ०६/२०१७ व ०७/२०१७ मध्ये प्रथम फिर्याद नोंदवण्याकरीता कोण आले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा रजिस्टर क्र. ०७/२०१७ मधील फिर्यादीला दवाखाण्यात जाण्याकरीता पोलीस यादी मी दिली नव्हती.

५. घटनास्थळाचा पंचनामा मी दिनांक २६.०१.२०१७ रोजी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने ज्या ठिकाणी घटना घडल्याचे कथन केले आहे त्या ठिकाणी लोकांची शेती असून त्या शेतीमध्ये घरे आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की केवळ लोकांच्या शेत्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्हयाच्या अनुषंगाने फिर्यादीच्या घरतील लोकांचेच जाब–जबाब नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासादरम्यान फिर्यादीचा विनयभंग केला, तिला धमकी दिली असा सांगणारा असा कोणताही स्वतंत्र साक्षीदार मिळून आला नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील पंचांना मी घटनास्थळ पंचनामा वाचून दाखवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा पंचनामा हा मी पोलीस स्टेशनमध्येच बनवला व तेथेच

आर.सी.सी. ४०/२०१७
**निशाणी ८३**

त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, वस्तुस्थिती नुसार मी घटनास्थळाचा पंचनामा बनवला नाही.

७. मी प्रल्हाद अनील हसे याचा जबाब नोंदवला होता. त्याने त्याचा जबाब देतेवेळी ''आरोपीने फिर्यादीच्या वस्त्रात हात घातला होता ही बाब सांगितली नव्हती''. त्याने जबाब देतेवेळी तो, जगन, सुमन, सागर असे एकत्र गेलो होता ही बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे तपासात फिर्यादीचा विनयभंग झाला तसेच आरोपींनी तिला धमकी व दम दिला ही बाब आढळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या खोट्या फिर्यादीचा खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.07.09 18:04:54 +0530

दिनांक ०९.०७.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.